मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन,२५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१

दूरध्वनी क्र. ०२२ - २२८३९९२४ Email ID: usecpr3.rdd-mh@nic.in

क्रमांक : संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२३९ /पंरा-३ दिनांक : २२ सप्टेंबर, २०२६

**प्रति,**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

२. अपर आयुक्त ( विकास),
(पुणे, नागपूर, कोकण,नाशिक,अमरावती, छत्रपती संभाजीनगर)

**विषय:- महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम,२०२६ च्या जनजागृतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या वेबिनारमध्ये ग्रामविकास विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेचा सहभाग सुनिश्चित करण्याबाबत.**

**संदर्भ:-** सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अ.शा.पत्र क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१७७/३ अे, दिनांक १७ सप्टेंबर,२०२६ व कृषि विभागाचे दि.२१ सप्टेंबर,२०२६ चे पत्र.

**महोदय,**

कृषि विभागाकडून प्राप्त संदर्भाधिन पत्रांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०९.०९.२०२६ अन्वये दि.१७ सप्टेंबर,२०२६ ते १७ ऑक्टोबर,२०२६ या कालावधीत “सेवा संकल्प अभियान” राबविण्यात येत आहे. सदर शासन निर्णयानुसार “महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम,२०२६” अन्वये महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वाटप करणे हा उपक्रम सदर अभियानामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

३. त्यानुषंगाने गावपातळीवर यंत्रणेला या कायद्याची व प्रमाणपत्र वाटप करण्याच्या प्रक्रियेची संपूर्ण माहिती होण्यासाठी कृषि विभागातर्फे दि.२३ सप्टेंबर,२०२६ रोजी You Tube Live च्या माध्यमातून ऑनलाईन वेबिनार आयोजित करण्यात आला आहे. आवश्यक सूचना सोबतच्या पत्रामध्ये आहेत.

४. तरी You Tube Live च्या माध्यमातून आयोजित **ऑनलाईन वेबिनारला आपण उपस्थित राहावे** तसेच **सदर वेबिनार करिता उपस्थित राहण्याबाबत व उपरोल्लिखित अधिनियम,२०२६ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने कृषि विभागाने दिलेल्या सूचनांनुसार नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात याव्यात, ही विनंती. सदर** You Tube Live वेबिनार ची लिंक आपणास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

आपला,

MANOJ TARACHAND NUKTE

Digitally signed by MANOJ TARACHAND NUKTE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Rural Development Dept, 2.5.4.20=70C9041272BA01816F5CC80DF55C2F2F65FAC16042016231 87CBA1A9D7B5628F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A25D479CD6F4FD68E08AD68CA5767A5D7247DCC97E 59CC34024C998C08615504, cn=MANOJ TARACHAND NUKTE
Date: 2026.03.22 12:11:10 +05'30'

सहपत्र- वरीलप्रमाणे

( मनोज नुक्ते)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत -** माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव -

१. मा. सचिव, कृषि विभाग, मंत्रालय , मुंबई

२. संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, राज्य व्यवस्थापन कक्ष, तळमजला, साखर संकुल, कृषी महाविद्यालय कंपाऊंड, नरवीर तानाजी वाडी, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५.

परिमल सिंह, भाप्रसे
सचिव (कृषि)

महाराष्ट्र शासन

अ.शा.पत्र. क्र. संकीर्ण-२०२५/
प्र.क्र. १७७/३अे
कृषि विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक:- १७ सप्टेंबर, २०२६.

प्र. स.
(ग्रा. वि. वि.)
क्र. 90668623
दि. 27/09

**विषय :** महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ च्या जनजागृतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या वेबिनारमध्ये ग्रामविकास विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेचा सहभाग सुनिश्चित करण्याबाबत.

**संदर्भ :** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक: सेसंअ-२०२६/प्र.क्र.९५/रवका-२, दिनांक ९ सप्टेंबर, २०२६ (सेवा संकल्प अभियान)

प्रिय डॉ. पुलकुंडवार,

राज्यातील महिला शेतकऱ्यांना कायदेशीर ओळख मिळवून देण्यासाठी विधिमंडळाने एकमताने महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ हा कायदा संमत केला असून सदर अधिनियमाद्वारे ज्या महिला प्रत्यक्ष शेती व शेतीपूरक व्यवसायामध्ये काम करत आहेत, त्या महिलांना "महिला शेतकरी प्रमाणपत्र" देण्यात येणार आहे.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. ०९.०९.२०२६ अन्वये दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत "सेवा संकल्प अभियान" राबविण्यात येत आहे. सदर शासन निर्णयानूसार "महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६" अन्वये महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वाटप करणे हा उपक्रम सदर अभियानामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

त्यानुषंगाने गावपातळीवरील यंत्रणेला या कायद्याची व प्रमाणपत्र वाटप करण्याच्या प्रक्रियेची संपूर्ण माहिती होण्यासाठी कृषि विभागातर्फे दि. २३ सप्टेंबर, २०२६ रोजी YouTube Live च्या माध्यमातून ऑनलाईन वेबिनार आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी, वरील वस्तुस्थितीच्या अनुषंगाने आपणास विनंती करण्यात येते की,

१. ग्रामविकास विभागांतर्गत कार्यरत गटविकास अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी तसेच सरपंच यांना सदर वेबिनारमध्ये सहभागी होण्याबाबत आपल्या स्तरावरून सूचना निर्गमित कराव्यात.

२. तसेच प्रस्तुत वेबिनारमध्ये आपण स्वतः सहभागी होऊन ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेस या कायद्याच्या जनजागृतीचे कार्य करण्यासाठी संबोधित करावे.

३. YouTube Live वेबिनारची लिंक सर्व क्षेत्रीय यंत्रणेस वेळेत पोहोचेल याची व्यवस्था करावी.

४. शक्य असल्यास ग्रामपंचायत स्तरावर एकत्रित Viewing Points आयोजित करावेत, जेणेकरून सर्व यंत्रणा (सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, उमेद सी.आर.पी., कृषि विभागाचे कर्मचारी, इ.) एकत्र येऊन वेबिनार पाहू शकतील.

५. सदर कायद्याच्या तरतुदी तसेच महिला शेतकरी प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या प्रक्रियेबाबत संबंधित गावातील सर्व महिला शेतकऱ्यांमध्ये व्यापक जनजागृती करून, त्यांना सदर प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. सदर काम ग्रामविकास विभागांतर्गत कार्यरत क्षेत्रीय यंत्रणेच्या माध्यमातून प्रभावीपणे करणे शक्य असल्याने, त्यानुषंगाने आपल्या स्तरावरून सर्व संबंधितांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्यात याव्यात, ही विनंती.

आपला
Parimal
(परिमल सिंह)

पं रा

प्रति,
डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (भा.प्र.से)
सचिव,ग्राम विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

महाराष्ट्र शासन
**कृषि विभाग,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
Email ID :desk-3a.agri@mah.gov.in

---

क्र : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१७७/३-अे **दिनांक : २१ सप्टेंबर, २०२६**

**प्रति,**

१. विभागीय कृषि सह संचालक ( सर्व),

२. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (सर्व),

**विषय** :-महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ संदर्भात ऑनलाईन वेबिनार आयोजित करण्याबाबत

**संदर्भ** :- शासनाचे समक्रमांकाचे दि.१७.०९.२०२६ रोजीचे पत्र

**महोदय,**

"महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६" कायद्याची तसेच महिला शेतकरी प्रमाणपत्र वाटपाच्या कार्यपद्धतीची गावपातळीवरील संबंधित यंत्रणेला सविस्तर माहिती व्हावी, यासाठी कृषि विभागामार्फत दिनांक २३ सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० वाजता YouTube Live च्या माध्यमातून ऑनलाईन वेबिनार आयोजित करण्यात आला आहे.

२. सदर वेबिनारमध्ये सचिव (कृषि), सचिव (ग्राम विकास), प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM-उमेद) यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

३. सदर वेबिनारचा गावपातळीवरील संबंधित यंत्रणेस व्यापक लाभ मिळावा यासाठी शक्यतो ग्रामपंचायत स्तरावर Viewing Point आयोजित करून आवश्यक तांत्रिक व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. सदर Viewing Point वर सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी/कर्मचारी, माविम व उमेद CRP, कृषी ताई, कृषी सखी, पशू सखी तसेच कृषि

विभागातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी एकत्रितपणे वेबिनारमध्ये सहभागी होण्याची व्यवस्था करण्यात यावी.

४. विभागीय कृषि सह संचालक व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी सदर बाबीस प्राधान्य देऊन त्यांच्या अधिनस्त क्षेत्रातील संबंधित यंत्रणेशी समन्वय साधून सदर वेबिनारमध्ये अपेक्षित सहभाग सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच, संदर्भाधीन पत्रामध्ये नमूद केलेल्या सूचनांनुसार पुढील कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

आपला

(विशाल टेके)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,

१. सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक

२. आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

५. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

६. निवड नस्ती का-३अे